RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ५५] गुरुवार, ऑक्टोबर ११, २०१८/आश्विन १९, शके १९४० [पृष्ठे ६, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ९७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २१.**—महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश . . . . पृष्ठे १–६

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,

मुंबई ४०० ००१, दिनांक ११ ऑक्टोबर २०१८.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXI OF 2018.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २१.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५९ चा ३.
१९६२ चा महा. ५

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या

राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१८ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

प्रकरण दोन

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाची सुधारणा.**

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १०-१क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश " महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १०-१क मध्ये,— १९५९ चा ३.

(क) पहिल्या परंतुकातील खंड (दोन) मध्ये, " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " बारा महिन्यांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ३१ मार्च २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) दुसऱ्या परंतुकामध्ये, " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " बारा महिन्यांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ३१ मार्च २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु तसेच, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली " सहा महिन्यांची " मुदत " बारा महिन्यांची " मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. ". २०१८ चा महा. अध्या. २१.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३०-१क ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ३०-१क मध्ये,—

(क) पहिल्या परंतुकातील खंड (दोन) मध्ये, " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " बारा महिन्यांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ३१ मार्च २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) दुसऱ्या परंतुकामध्ये, " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " बारा महिन्यांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ३१ मार्च २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु तसेच, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली " सहा महिन्यांची " मुदत " बारा महिन्यांची " मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. ". २०१८ चा महा. अध्या. २१.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची सुधारणा.

१९६२ चा महा. ५. निर्देश

**४.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १२क मध्ये,— (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२क ची सुधारणा.)

(क) पहिल्या परंतुकातील, खंड (दोन) मध्ये, "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी, "बारा महिन्यांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ७ मे २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) दुसऱ्या परंतुकामध्ये, "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी, "बारा महिन्यांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ७ मे २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

२०१८ चा महा. अध्या. २१.

" परंतु तसेच, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची" मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. ".

**५.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ४२ याच्या पोट-कलम (६क) मध्ये,— (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४२ ची सुधारणा.)

(क) पहिल्या परंतुकातील खंड (दोन) मध्ये, "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी, "बारा महिन्यांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ७ मे २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) दुसऱ्या परंतुकामध्ये, "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी, "बारा महिन्यांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ७ मे २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

२०१८ चा महा. अध्या. २१.

"परंतु तसेच, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची" मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. ".

**६.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, याच्या कलम ६७ याच्या पोट-कलम (७क) मध्ये,— (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ६७ ची सुधारणा.)

(क) पहिल्या परंतुकातील खंड (दोन) मध्ये, "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी, "बारा महिन्यांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ७ मे २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) दुसऱ्या परंतुकामध्ये, "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी, "बारा महिन्यांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक ७ मे २०१६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु तसेच, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली " सहा महिन्यांची " मुदत " बारा महिन्यांची " मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. ". २०१८ चा महा. अध्या. २१.

प्रकरण चार

**संकीर्ण**

विवक्षित निवडणुकांबाबतची व्यावृत्ती.

**७.** महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी अंमलात असल्याप्रमाणे, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम १०-१क किंवा कलम ३०-१क, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, याचे कलम १२-क किंवा कलम ४२ चे पोट-कलम (६क) किंवा कलम ६७ चे पोट-कलम (७क) यांच्या तरतुदी लक्षात घेता, त्यांच्या परिणामी रिक्त झालेली पदे भरण्याकरिता अशा प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, राज्य निवडणूक आयोगाने, ज्या निवडणुका घेतलेल्या असतील किंवा त्या घेण्याबद्दलचा कोणताही कार्यक्रम घोषित केलेला असेल अशा निवडणुकांवर या अध्यादेशातील कोणत्याही गोष्टींचा परिणाम होणार नाही. २०१८ चा महा. अध्या. २१.

विवक्षित अनर्हतेबाबतची व्यावृत्ती.

**८.** या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, कोणत्याही व्यक्तीने जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र प्राप्त केलेले असेल मात्र, असे प्रमाणपत्र दाखल केलेले नसेल अशा व्यक्तीने जर या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या मुदतीच्या आत असे प्रमाणपत्र सादर केले तर, अशी कोणतीही व्यक्ती, प्रस्तुत पंचायत कायद्यांच्या तरतुदींअन्वये अनर्ह ठरली असल्याचे मानण्यात येणार नाही :

परंतु, या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी राज्य निवडणूक आयोगाने अशा व्यक्तीचे रिक्त पद भरण्यासाठी आधीच निवडणूक घेतली असेल किंवा अशी निवडणूक घेण्यासाठी कार्यक्रम घोषित केला असेल त्याबाबतीत, या कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**९.** (१) या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे कोणतेही निदेश देता येतील. १९५९ चा ३. १९६२ चा महा. ५.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

## निवेदन.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याचे कलम १०-१क आणि कलम ३०-१क आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याचे कलम १२ क, कलम ४२ चे पोट-कलम (६क) आणि कलम ६७ चे पोट-कलम (७क) यांमध्ये अशी तरतूद आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांतील व्यक्तींसाठी राखीव असलेल्या जागेवर निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेली प्रत्येक व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत, महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३) आणि त्याखाली केलेले नियम, यांच्या तरतुदींनुसार सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करील.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम याची कलमे १०-१क आणि ३०-१क यांमध्ये, दिनांक ३१ मार्च २०१६ पासून सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० द्वारे सुधारणा करण्यात आली आहे आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची कलमे १२क, ४२ व ६७ यांमध्ये दिनांक ७ मे २०१६ पासून सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ द्वारे सुधारणा करण्यात आली आहे. उक्त कलमांन्वये, उमेदवाराला, राखीव जागेवर निवडणूक लढविण्यासाठी नामनिर्देशन पत्रासोबत वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे दाखल केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीच्या आत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील, याबद्दलचे हमीपत्र सादर करण्याची परवानगी दिली आहे.

३. जात पडताळणी समित्यांवर वैधता प्रमाणपत्रे देण्याच्या कामाचा अत्याधिक भार आहे आणि परिणामी निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यात अडचणी येतात. संबंधित पंचायत कायद्यांच्या तरतुदी लक्षात घेता, निवडून आलेल्या उमेदवाराने, तो निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीच्या आत, जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, त्याची निवड भूतलक्षी प्रभावाने संपुष्टात येईल आणि तो, ते पद धारण करण्यास निरर्ह ठरेल.

४. ज्यांनी अगोदरच जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे अशा निवडून आलेल्या उमेदवारांनी त्याने सादर केलेल्या हमीपत्रात नमूद केलेल्या मुदतीच्या आत, जात पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही, केवळ एवढ्याच कारणावरून ते उमेदवार निरर्ह ठरणार नाहीत याची सुनिश्चिती करण्यासाठी, त्या निवडून आलेल्या उमेदवारांना असे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणखी सहा महिन्यांची मुदत वाढवून देण्याची तरतूद करणे इष्ट वाटते. हे लक्षात घेता, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम याची कलमे १०-१क व ३०-१क आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची कलमे १२-क, ४२ व ६७ यांमध्ये, भूतलक्षी प्रभावाने, म्हणजे अनुक्रमे, सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० आणि सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ यांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, यथोचितरित्या सुधारणा करणे इष्ट वाटते.

भूतलक्षी प्रभावासह केलेल्या अशा सुधारणा लक्षात घेता, यथोचित व्यावृत्तीच्या तरतुदी आणि तसेच प्रस्तावित सुधारणेमुळे, उक्त अधिनियमांच्या तरतुदी अंमलात आणताना उद्‌भवतील अशा अडचणी दूर करण्यासाठीच्या तरतुदी, समाविष्ट करणे, इष्ट वाटते.

वरील प्रयोजने साध्य करण्यासाठी, पंचायत कायद्यांत यथोचितरित्या, सुधारणा करण्यात येत आहेत.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही, आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा ५) यांत आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे; म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १० ऑक्टोबर २०१८.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**असीम गुप्ता,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ४, अंक ६७] गुरुवार, ऑक्टोबर ११, २०१८ / आश्विन १९, शके १९४० [पृष्ठे ६, किंमत : रुपये २७.००

### असाधारण क्रमांक १३७

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2018 (Mah. Ord. XXI of 2018), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2018 (Mah. Ord. XXI of 2018), published under the authority of the Governor].

---

**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT**

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,
Fort, Mumbai 400 001, dated the 11th October 2018.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXI OF 2018.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Village Panchayats Act and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, for the purposes hereinafter appearing ; III of 1959. Mah. V of 1962.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

## CHAPTER I

### PRELIMINARY

Short title and commencement.

**1**. (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2018.

(*2*) It shall come into force at once.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.

Amendment of section 10-1A of III of 1959.

**2.** In section 10-1A of the Maharashtra Village Panchayats Act (hereinafter in this Chapter referred to as " Maharashtra Village Panchayats Act "),— III of 1959.

(*a*) in the first proviso, in clause *(ii),* for the words " six months " the words " twelve months " shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 31st March 2016 ;

(*b*) in the second proviso, for the words " six months " the words " twelve months " shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 31st March 2016 ;

(*c*) after the second proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, in respect of the undertaking filed by any person under clause *(ii)* of the first proviso, before the date of commencement of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2018, the period of "six months" specified in such undertaking shall be deemed to have been substituted as " twelve months ".". Mah. Ord. XXI of 2018.

Amendment of section 30-1A of III of 1959.

**3**. In section 30-1A of the Maharashtra Village Panchayats Act,—

(*a*) in the first proviso, in clause *(ii),* for the words " six months " the words " twelve months" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 31st March 2016 ;

(*b*) in the second proviso, for the words " six months" the words "twelve months " shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 31st March 2016 ;

(*c*) after the second proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, in respect of the undertaking filed by any person under clause (*ii*) of the first proviso, before the date of commencement of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2018, the period of " six months " specified in such undertaking shall be deemed to have been substituted as " twelve months ".". Mah. Ord. XXI of 2018.

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

Mah. V of 1962. **4**. In section 12A of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (hereinafter in this Chapter referred to as "Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act "),— Amendment of section 12A of Mah.V of 1962.

(*a*) in the first proviso, in clause *(ii),* for the words " six months " the words " twelve months" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 7th May 2016 ;

(*b*) in the second proviso, for the words "six months" the words " twelve months " shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 7th May 2016 ;

(*c*) after the second proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, in respect of the undertaking filed by any person under clause *(ii)* of the first proviso, before the date of commencement of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2018, the period of " six months " specified in such undertaking shall be deemed to have been substituted as "twelve months".". Mah. Ord. XXI of 2018.

**5**. In section 42 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, in sub-section (6A),— Amendment of section 42 of Mah. V of 1962.

(*a*) in the first proviso, in clause (*ii*), for the words " six months " the words " twelve months " shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 7th May 2016 ;

(*b*) in the second proviso, for the words " six months " the words "twelve months" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 7th May 2016 ;

(*c*) after the second proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, in respect of the undertaking filed by any person under clause *(ii)* of the first proviso, before the date of commencement of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2018, the period of " six months " specified in such undertaking shall be deemed to have been substituted as " twelve months ".". Mah. Ord. XXI of 2018.

**6**. In section 67 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, in sub-section *(7A),—* Amendment of section 67 of Mah. V of 1962.

(*a*) in the first proviso, in clause (*ii*), for the words "six months" the words "twelve months" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 7th May 2016 ;

(*b*) in the second proviso, for the words "six months" the words " twelve months" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from 7th May 2016 ;

(*c*) after the second proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, in respect of the undertaking filed by any person under clause *(ii)* of the first proviso, before the date of commencement of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2018, the period of " six months " specified in such undertaking shall be deemed to have been substituted as " twelve months ".". Mah. Ord. XXI of 2018.

## CHAPTER IV

## MISCELLANEOUS

Saving as to certain elections.

**7**. (*1*) Nothing in this Ordinance shall affect the elections conducted by the State Election Commission for conducting the elections or any programme declared by it therefor, prior to the date of commencement of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2018, for filling up the resultant vacancy in view of the provisions of section 10-1A or section 30-1A of the Maharashtra Village Panchayats Act ; section 12A or sub-section *(6A)* of section 42 or sub-section *(7A)* of section 67 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, as it stood prior to such date of commencement.

Mah. Ord. XXI of 2018. III of 1959. Mah. V of 1962.

Saving as to certain disqualifications.

**8.** Any person, who has obtained the Caste Certificate and Validity Certificate, but has not filed such certificate prior to the date of commencement of this Ordinance, shall not be deemed to be disqualified under the provisions of the relevant Panchayat law, if he submits such certificate within a period of fifteen days from the date of commencement of this Ordinance :

Provided that, the provisions of this section shall not apply where the State Election Commission has already prior to the date of commencement of this Ordinance held elections to fill the vacancy of such person or declared the programme for holding of such election.

Power to remove difficulty.

**9**. (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of the Maharashtra Village Panchayats Act or, as the case may be, the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, as amended by this Ordinance, the State Government may, as the occasion arises, by an Order published in the *Official Gazette*, give such directions not inconsistent with the provisions of the said Acts as amended by this Ordinance, as may appear to it to be necessary or expedient for the purpose of removing the difficulty.

III of 1959. Mah. V of 1962.

(*2*) Every order made under sub-section *(1)* shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

## STATEMENT

Section 10-1A and section 30-1A of the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959); section 12 A, sub-section *(6A)* of section 42 and sub-section *(7A)* of section 67 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), provides that, every person desirous of contesting election to a seat reserved for person belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes or, as the case may be, Backward Classes of citizens, shall submit, alongwith the nomination paper, Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000 (Mah.XXIII of 2001) and the rules made thereunder.

2. The said sections 10-1A and 30-1A of the Maharashtra Village Panchayats Act have been amended by the Maharashtra Act No. X of 2016 with effect from the 31st March 2016, and sections 12A, 42 and 67 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 have been amended by the Maharashtra Act No. XXI of 2016 with effect from the 7th May 2016 which permits the candidate to submit, alongwith the nomination papers for election to a reserved seat, a true copy of the application preferred by him to the Scrutiny Committee for issuance of the Validity Certificate or any other proof of having made such application to the Scrutiny Committee; and an undertaking that he shall submit, within a period of six months from the date of his election, the Validity Certificate issued by the Scrutiny Committee.

3. The Scrutiny Committees are overburdened with the task of issuing the Validity Certificates and this results in difficulties for the elected candidates to obtain the Validity Certificate. In view of the provisions of the relevant Panchayat law, in case the elected candidate fails to produce the Validity Certificate, within a period of six months from the date of his election, his election shall stands to be terminated retrospectively and shall stands disqualified for holding the post.

4. To ensure that the elected candidates, who have already obtained the Caste Certificate and the Validity Certificate, would not be disqualified merely because of failure to produce the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in time as per the undertaking filed by him, it is expedient to provide for further extension of six months to the elected candidates for submitting such certificate. In view of this, it is expedient to suitably amend the sections 10-1A and 30- 1A of the Maharashtra Village Panchayats Act and sections 12A, 42 and 67 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, retrospectively, *i.e.* the date of commencement of the Maharashtra Act Nos. X of 2016 and XXI of 2016, respectively.

In view of such amendments, with retrospective effect, it is expedient to incorporate the suitable saving provisions and also the provision for removal of difficulty.

For achieving the above purposes, the relevant Panchayat laws are amended, suitably.

5. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959) and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 10th October 2018.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ASEEM GUPTA,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.